पंतप्रधान कृषी सिंचन व बळीराजा जलसंजीवनी योजनेतील प्रकल्पांना राज्य शासनाच्या हिश्यापोटी नाबार्ड कडून कर्ज रुपाने मिळणारी रक्कम तसेच केंद्रीय अर्थसहाय्याद्वारे मिळणारी रक्कम (बळीराजा जलसंजीवनी योजना वगळता) जलसंपदा विभागाच्या अखत्यारितील महामंडळाच्या खात्यात थेट वर्ग करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यास मुदतवाढ देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्रमांक: पीएलएन-२०१८/प्र.क्र.१६०/निवसं-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक- ११ सप्टेंबर, २०१९

संदर्भ :- १) शासन निर्णय क्रमांक: पीएलएन-२०१८/प्र.क्र.१६०/निवसं-३ दि.१९/१२/२०१८

२) शासन निर्णय शुद्धीपत्रक क्रमांक: पीएलएन-२०१८/प्र.क्र.१६०/निवसं-३ ,२/०१/२०१९

३) शासन निर्णय शुद्धीपत्रक क्रमांक: पीएलएन-२०१८/प्र.क्र.१६०/निवसं-३ दि.१२/०२/२०१९

प्रस्तावना :-

पंतप्रधान कृषि सिंचन योजना व बळीराजा जलसंजीवनी योजनेतील प्रकल्पांना राज्य शासनाच्या हिश्यापोटी नाबार्डकडून कर्जरूपाने प्राप्त होणारी रक्कम तसेच पंतप्रधान कृषि सिंचना योजनेंतर्गत केंद्रीय अर्थसहाय्याद्वारे मिळणारी रक्कम राज्यातील पाटबंधारे विकास महामंडळाच्या बँक खात्यात थेट वर्ग करण्याचा निर्णय संदर्भ क्रमांक १ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. सदर निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार व्यवस्था निर्माण करणे तसेच अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणी विचारात घेऊन सदर निर्णयाची अंमलबजावणी करण्यास मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सदर निर्णय सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात डिसेंबर, २०१८ मध्ये घेण्यात आल्यामुळे या आर्थिक वर्षात महामंडळांना अर्थसंकल्पीय तरतूदीच्या मर्यादेत निधी उपलब्ध करून दयावयाचा असल्यामुळे व महामंडळांना या निर्णयापूर्वी अर्थसंकल्पीय निधीतून निधी उपलब्ध करून दिला असल्यामुळे द्विरुक्ती टाळण्यासाठी सन २०१८-१९ मध्ये या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात आली नाही. सबब, पंतप्रधान कृषि सिचंन योजना व बळीराजा जलसंजीवनी योजना या दोन्ही योजनांतर्गत प्राप्त होणारे केंद्रीय अर्थसहाय्य व राज्य शासनाच्या हिश्यापोटी नाबार्डकडून प्राप्त होणारे कर्ज राज्याच्या एकत्रित निधीत जमा करण्यात आले.

सन २०१९-२० या आर्थिक वर्षात पंतप्रधान कृषि सिंचन योजना व बळीराजा जलसंजीवनी योजनेतील प्रकल्पांकरीता कर्ज घेण्यासाठी केंद्र शासनाची अनुमती मिळणे, बळीराजा जलसंजीवनी योजनेंतर्गत RIDF अंतर्गत प्रकल्पांच्या कर्ज मंजूरीसाठी नाबार्डच्या Governing

Board ची मान्यता मिळणे व त्यानंतर प्रस्ताव नाबार्ड/केंद्र शासनास सादर करून त्यांच्या मंजूरीनंतर प्रकल्पांना निधी उपलब्ध करून देण्यास बराच कालावधी जाणार आहे. त्यामुळे विहित कालावधीत प्रकल्प पूर्ण करण्यासाठी प्रकल्पांच्या गरजेनुसार निधी उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याने या प्रकल्पांना सन २०१९-२० मध्ये केलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदीतून निधी उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने संदर्भ क्रमांक १ अन्वये घेतलेल्या निर्णयास मुदतवाढ देण्यात येत आहे. त्यामुळे सन २०१९-२० साठी पंतप्रधान कृषि सिंचन योजना व बळीराजा जलसंजीवनी योजनेतील प्रकल्पांना राज्य शासनाच्या हिश्यापोटी नाबार्डकडून कर्जरूपाने प्राप्त होणारी रक्कम तसेच पंतप्रधान कृषि सिंचना योजनेंतर्गत केंद्रीय अर्थसहाय्याद्वारे मिळणारी रक्कम राज्य शासनाच्या एकत्रित निधीत जमा करण्यात यावी. संदर्भ क्रमांक १ अन्वये घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी सन २०२०-२१ या आर्थिक वर्षापासून करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१७३/१४३३, दिनांक ९.०८.२०१९ व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.४६/ऋण व हमी, दिनांक ११.०९.२०१९ अन्वये व सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०९१११९४८३१०९२७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्रचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sanjay Madhukar Belsare

Digitally signed by Sanjay Madhukar Belsare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c8a87b959da59cf8368ea43eaa053e9d998e5a75fcbc096db9f951769cd1cef2, serialNumber=b619ff7825128b0ac0c1d94202f9f411ece90f19d72ab83faf5a9ddbdfc515de, cn=Sanjay Madhukar Belsare
Date: 2019.09.11 20:00:10 +05'30'

(डॉ. संजय बेलसरे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे अपर मुख्य सचिव.
३. सर्व मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव.
४. मा. विरोधी पक्ष नेता विधानपरिषद/विधानसभा, विधानभवन, मुंबई यांचे खाजगी सचिव.
५. मा. मुख्य सचिव यांचे स्विय सहायक, मंत्रालय, मुंबई यांचे स्विय सहायक.
६. सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई यांचे स्विय सहायक.
७. महालेखाकार कार्यालय, मुंबई / नागपूर
८. सर्व कार्यकारी संचालक, पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर/औरंगाबाद/पुणे/जळगाव/ठाणे.
९. संचालक, (लेखा व कोषागारे), मुंबई .
१०. संचालक (सुधारणा), संचालनालय, लेखा व कोषागारे , नवीन प्रशासकीय भवन, ५ वा मजला , मुंबई.
११. सर्व मुख्य अभियंता, पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर/औरंगाबाद/पुणे/जळगाव/ठाणे.
१२. सर्व अधिक्षक अभियंता, पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर/औरंगाबाद/पुणे/जळगाव/ठाणे.
१३. सर्व कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर/औरंगाबाद/पुणे/जळगाव/ठाणे.
१४. सर्व उपविभागीय अभियंता, पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर/औरंगाबाद/पुणे/जळगाव/ठाणे.
१५. निवसं-३ कार्यासन संग्रहार्थ.